# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १६/०४/२०१७

## *साळवे नर्सिंग कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद साळवे याला अटक*

दिनांक १५/०४/२०१७ रोजी पोस्टे धानोरा अप.क्र. २३/०१७ कलम ४२०, ४६८, ४७१ भा.द.वि. नुसार साहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली, विनोद गोविंद कुलकणी वय-५६ वर्ष, यांनी साळवे नर्सिंग कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद वासुदेव साळवे यांनी ऐ.एन.एम./आर.जि.एम.एम. ५ विद्यार्थिनीची सन २०१४-१५ या कालावधीमध्ये निर्वाहभत्ता स्कॉलरशीप अर्जावर बनावट खाते क्रमांक टाकुन निर्वाहभत्त्याची रक्कम हडप करून आर्थिक फसवणुक केली आहे. तसेच शासनाकडून शिक्षण शुल्क प्राप्त करुन देखिल विद्यार्थिनींकडून शिक्षण शुल्क या नावाने रक्कम वसुल करुन विद्यार्थिनींची व शासनाची आर्थिक फसवणुक केल्याची लक्ष्यात आल्याने आरोपी डॉ. प्रमोद वासुदेव साळवे यांच्यावर वरील कलमान्वये गुन्हा नोंद झाल्याने आरोपी डॉ. प्रमोद साळवे यास तात्काळ दिनांक १५/०४/२०१७ रोजी अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढिल तपास वरिष्ठांच्या आदेशाने पोउपनि वाय.पी. सुर्यवंशी, पोमके चातगांव

हे करीत आहे. आरोपी डॉ. साळवे यास न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने डॉ. साळवे यास दिनांक १८/०४/२०१७ पर्यंत दोन दिवसाचा पी.सी.आर. दिला आहे.

याअगोदर डॉ. साळवे याचे विरुध्द चातगांव नर्सिंग होम मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थिनींनी त्यांचेवर होत असलेल्या अत्याचार व शारिरीक शोषण बाबत पोलीस स्टेशन धानोरा येथे गुन्हा नोंद केलेला आहे.

